R.No.MAHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक १०८ गुरूवार दि.०६ नोव्हेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## ही थट्टा चाललीय ; मराठवाड्याच्या दौऱ्यावर येताच उद्धव ठाकरेंचा सरकारवर घणाघात, शेतकऱ्यांना दिला 'हा' शब्द

राजकीय प्रचाराला आलेलो नाही. नेते येतात आणि तुमच्या कोपराला गूळ लावून जातात. शेतकऱ्यांनी आयुष्यात पाहिला नाही एवढा पाऊस झाला. हेक्टरी ५० हजारांची मागणी शेतकऱ्यांची आहे. कर्जमाफीही झाली आहे. दयावान सरकारचा अभ्यास सुरू आहे. अभ्यास कसला करताय. परदेशी समिती येणार म्हणे. मुख्यमंत्र्यानी कोपराला गूळ लावत ३० जून २०२६ ची तारीख सांगितली आहे, असा टोला उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लगावला.

आजपासून उद्धव ठाकरे हे मराठ्याच्या दौऱ्यावर आले आहेत. चार दिवसांच्या दौऱ्यात ते येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जात त्यांच्याशी पुन्हा एकदा संवाद साधणार आहेत. आज त्यांनी मराठवाड्यातील नांदर येथील शेतकऱ्यांशी संवाद साधला.

सरकारने अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याचे आश्वासन जाहीर केले होते. पण अजूनही अनेकांना मदत मिळालेली नाही. पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत. पॅकेज ही थट्टा आहे. अकोल्यात दोन रूपये पिकविमा मिळाला आहे. ही थट्टा चाललीय, असे म्हणत त्यांनी सरकारला धारेवर धरले. न्याय मिळेपर्यंत तुमच्यासोबत राहणार असा शब्द उद्धव ठाकरेंनी



शेतकऱ्यांना दिला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे शेतकऱ्यांची तात्काळ कर्जमाफी करावी या मागणीसाठी आग्रही आहेत. नुकतेच प्रहारचे बच्चू कडू यांनी कर्जमाफीसाठी महाएल्गार पुकारला होता. जोपर्यंत शेतकऱ्यांची कर्जमाफी करत नाही, तोपर्यंत मागे हटणार नाही, असा निर्धार त्यांनी केला होता. या आंदोलनाची दखल सरकारला घ्यावी लागली. सरकारसोबत बच्चू कडू आणि शेतकरी यांची बैठक पार पडली. जूनची मुदत आम्हाला मान्य नाही: उद्धव ठाकरे या बैठकीनंतर बच्चू कडू यांनी आंदोलन मागे घेतले.

## यशवंतवाडी ग्रामपंचायतचा अभिनव उपक्रम; १० शालेय विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप





लातूर :- गावातील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागते प्रवासाची कसलीही सुविधा नसल्याची अडचण लक्षात घेऊन रेणापूर तालुक्यातील मौजे यशवंतवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने दहा शालेय विद्यार्थ्यांना भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सायकलीचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन सायकल वाटपाचा अभिनव उपक्रम हाती घेतल्याबद्दल यशवंतवाडी ग्रामपंचायतचे अनेकांनी कौतुक केले आहे.

रेणापूर तालुक्यातील मौजे यशवंतवाडी येथे शिक्षणाची सोय नसल्याने गावातील मुला मुलींना कारेपूर येथे शाळेकरीता जावे लागत असे मात्र शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रवासाची कुठलीच नियमित सोय नसल्याने पायी चालत जाऊन शिक्षण घ्यावे लागत होते. शालेय विद्यार्थ्यांची ही मोठी गैरसोय लक्षात घेऊन यशवंतवाडी ग्रामपंचायतीने पंधराव्या वित्त आयोगा अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी सायकली खरेदी करण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

पंधराव्या वित्त आयोगा अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या १० सायकलीचे वाटप लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते बुधवारी सकाळी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात करण्यात आले. यावेळी अनुष्का चव्हाण, राधा सूर्यवंशी, जागृती सूर्यवंशी, भक्ती चव्हाण, मोहिनी सूर्यवंशी, सार्थक मोरे, माऊली जाधव, गजानन चव्हाण, जानवी चव्हाण, नक्ष चव्हाण या शालेय विद्यार्थी आणि विद्यार्थिनीच्या चेहऱ्यावर मोठा आनंद दिसून येत होता.

सायकल वाटप प्रसंगी यशवंतवाडीचे सरपंच ओम चव्हाण यांच्यासह भाजपाचे महेंद्र गोडभरले, अभिषेक आकनगिरे, दशरथ सरवदे, वसंत करमुडे, विजय काळे, अमर चव्हाण, भाऊसाहेब गुळबिले, लक्ष्मण यादव, संतोष चव्हाण, श्रीकृष्ण जाधव, बाजीराव साखरे, गणपत चव्हाण, विठ्ठल चव्हाण, विष्णू चव्हाण, रामकिशन सूर्यवंशी, किशोर चव्हाण, महेश सूर्यवंशी, सुनील चव्हाण, मुकुंद चव्हाण, बालासाहेब सूर्यवंशी यांच्यासह ग्रामस्थ विद्यार्थ्यांचे पालक व इतर अनेक जण होते. यावेळी आ. रमेशअप्पा कराड यांनी शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधून शैक्षणिक प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या. यशवंतवाडी ग्रामपंचायतीने सायकली वाटपाचा अभिनव उपक्रम हाती घेतल्याबद्दल शालेय विद्यार्थ्यांच्या पालकांनी समाधान व्यक्त केले तर अनेकांनी कौतुक केले.

## आ. कराड यांच्या प्रयत्नातून १४ विकास कामासाठी तांडा वस्ती सुधार योजने अंतर्गत एक कोटीचा निधी



लातूर :- वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील १४ गावातील विविध विकास कामासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने त्या त्या वस्तीतील नागरिकांच्या वतीने आ. कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध वाडी वस्तीत राज्याच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी मिळावा यासाठी राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री ना. अतुलजी सावे यांच्याकडे भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील १४ विविध वाडी वस्तीतील विकास कामासाठी तब्बल १ कोटी रुपयांचा निधी राज्याच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजुरी दिली आहे.

वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत लातूर तालुक्यातील ८ रेणापूर तालुक्यातील ८ आणि भादा सर्कल मधील २ गावे असे एकूण लातूर ग्रामीण मतदार संघातील १४ गावाचा समावेश आहे. त्यात लातूर तालुका - भाडगाव खंडोबा मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक ७ लक्ष, भातांगळी खंडोबा मंदिर समोर पेव्हर ब्लॉक ७ लक्ष, बोरगाव बु. ज्योतिबा नगर रस्ता करणे ७ लक्ष, मुशिराबाद होळकर नगर पेव्हर ब्लॉक रस्ता करणे ७ लक्ष, वांजरखेडा चव्हाणवाडी रस्ता करणे ७ लक्ष, कानडी बोरगाव अहिल्यादेवी होळकर नगर रस्ता करणे ७ लक्ष, रेणापूर तालुक्यातील - दर्जी बोरगाव भनाई मंदिरासमोर सभामंडप बांधकाम करणे ८ लक्ष, गरसुळी गरसुळीतांडा येथे रस्ता करणे ७ लक्ष, भोकरंबा खंडोबा वस्ती सिमेंट रस्ता करणे ७ लक्ष, तळणी धनगर वस्ती रस्ता करणे ७ लक्ष, फावडेवाडी सिमेंट रस्ता करणे ७ लक्ष, आणि भादा सर्कल मधील सत्तरधरवाडी सेवादास नगर येथे सिमेंट रस्ता करणे ७ लक्ष, भेटा धनगर वस्ती बिरदेव मंदिरासमोर सभामंडप बांधकाम करणे ८ लक्ष याप्रमाणे एकूण १ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेतून १४ वाडी वस्ती व गावातील विविध विकास कामासाठी निधी मिळवून दिल्याबद्दल त्यांचे त्या त्या भागातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## अल्पवयीन बालिकेवर अत्याचार; आरोपी अटकेत

लातूर :- शिरूर अनंतपाळ तालुक्यातील एका गावात ९ वर्षीय बालिकेवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी संशयित आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बालिका गावातील औषध विक्री दुकानात औषध घेण्यासाठी गेली असता दुकानातील कर्मचाऱ्याने तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. घटनेनंतर बालिकेने घरी येऊन आईला सर्व सांगितल्यावर तिने तत्काळ पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणी पॉक्सो कायदा आणि *भा.दं.वि.*च्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीस अटक केली आहे. घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.

## पृथ्वीराज सिरसाट- जगन्नाथ पाटील यांचा संयुक्त सत्कार सोहळा उत्साहात पार





लातूर :- सहकार क्षेत्रातील दोन मान्यवरांचा संयुक्त सत्कार सोहळा लातूर शहरात उत्साहात पार पडला. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक पृथ्वीराज सिरसाट यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा शाल-हार, पेढे व केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. त्याचबरोबर, लातूर जिल्हा मजूर सहकारी संघ मर्यादित लातूरच्या चेअरमनपदी जगन्नाथ पाटील यांच्या निवडीबद्दल त्यांचा शाल-हार, आणि पेढे देऊन सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम बसवेश्वर कॉलेजजवळील सुदर्शन टॉवर येथे पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन सुधीर डोंबे व सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी केले होते. यावेळी दैनिक महावृत्तचे संपादक आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा लातूरचे जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते, प्रा. राहुल डोंबे, सुधीर डोंबे, किशोर पाटील, तुकाराम कांबळे, सादिक तांबोळी आणि इनायत पठाण आदी मान्यवर उपस्थित होते. सत्कारानंतर उपस्थितांनी दोन्ही मान्यवरांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देत त्यांना यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.

## अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमकर यांच्या अवाहनाला शेतक-यांचा प्रतिसाद शेतरस्त्याचा वाद सामंजस्याने निकाली



लातूर :- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये दाखल असलेल्या शेतरस्त्याच्या एका क्लिष्ट प्रकरणामध्ये अपर जिल्हाधिकारी, लातूर, श्रीमती शिल्पा करमरकर यांच्या आवाहनामुळे तसेच दोन्ही बाजूचे विधिज्ञ ॲड.पी.आर. केदार व ॲड. महिपाल पाटील तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या विशेष प्रयत्नाने दोन्ही पक्षकारांनी सामंजस्य दाखवत अखेर तडजोड केली आहे. संदीपान गुंडाजी मोरे व इतर विरुद्ध लिंबराज धोंडीबा मोरे व इतर यांच्यामध्ये मौजे बोटकुळ, ता. निलंगा, जि. लातूर येथील जमीन गट क्र. १९४, १९५ व २०० ला ये-जा करण्यासाठी असलेल्या रस्त्याबाबतचे हे प्रकरण २०२३ पासून अपर जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयात प्रलंबित होते. दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये दोन्ही पक्षकारांनी एकत्रितपणे तडजोड केल्यामुळे हा दिर्घकाळ चाललेला वाद संपुष्टात आला आहे. सदरचा शेतरस्त्याचा वाद सामंजस्याने मिटल्यानंतर उपस्थित सर्व शेतक-यांचे व संबंधित विधिज्ञांचे गुलाबपुष्प देवून श्रीमती शिल्पा करमरकर, अपर जिल्हाधिकारी, लातूर, यांनी सत्कार केला. तसेच महसूल न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे कायदेशीर चौकटीत राहून तडजोडीने निकाली काढण्यासाठी नागरिकांनी पुढे यावे. असे अपर जिल्हाधिकारी, श्रीमती करमरकर यांनी नागरिकांना आवाहन केले.

## औसा रोडवर अपघातात एका इसमाचा जागीच मृत्यू




लातूर :- औसा रोडवरील गोदावरी स्वीट होमजवळ ५ नोव्हेंबर रोजी सकाळी झालेल्या अपघातात एका इसमाचा जागीच मृत्यू झाला. शिवशाही बसने धडक दिल्याने ही दुर्घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास एक इसम किराणा दुकानातून पिशवीत साहित्य घेऊन रस्ता ओलांडत होता. त्यावेळी एका दुचाकीस्वाराने त्याला धडक दिल्याने तो खाली पडला. त्याच क्षणी लातूरहून निलंग्याकडे जाणारी शिवशाही (एमएच-०९ ईएम ८७५२) बस आली आणि तिच्या चाकाखाली सापडल्याने त्या इसमाचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर नागरिकांनी तात्काळ पोलिसांना कळवले. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात पाठवला. खिशात सापडलेल्या आधार कार्डनुसार मृत व्यक्तीचे नाव सुनील गोविंदराव बतनेवकील (वय ६०, रा. अंबुलगा बु., लातूर) असे असल्याचे समजते. पोलिसांनी अपघाताची नोंद घेत तपास सुरू केला आहे. स्थानिक नागरिकांनी औसा रोडवरील बेशिस्त वाहतूक आणि वाढता अपघातदर यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दररोज वाहतुकीची गर्दी व नियमांचे उल्लंघन यामुळे असे अपघात घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# संपादकीय

## कृतज्ञ आणि कृतार्थ!

आज पाच नोव्हेंबर. वयाची ऐंशी वर्षे पूर्ण करून आम्ही आज एक्याऐंशीव्या वर्षात पदार्पण करीत आहोत. पत्रकारिता आणि सार्वजनिक, सामाजिक जीवनातील प्रदीर्घ साठ वर्षांच्या वाटचालीत हजारो सुहृद आणि लाखो जनसंमर्दाचे आम्हाला भावबळ आणि पाठबळ लाभले. या समृद्ध शिदोरीच्या शक्तीवर समाज ऋणातून उतराई होण्याचा प्रयत्न केला. तो कितपत यशस्वी, त्याचा निवाडा जनता जनार्दनाने करायचा आहे. पत्रकारिता हे सार्वजनिक व्रतच असते. सार्वजनिक जीवनाशीच पत्रकारितेची अतूट बांधिलकी असते. ही बांधिलकी आम्ही जीवापाड जपली आणि अनेक सार्वजनिक कार्यात भाग घेताना, सामाजिक प्रश्नांना हात घालताना हीच समरसता जपली आणि जोपासली. १९६५ मध्ये भारत–पाकिस्तान युद्धावेळी भारतीय जवानांनी लाहोरवर धडक मारली तेव्हा पश्चिम महाराष्ट्र विद्यार्थी संघटनेचा अध्यक्ष म्हणून आम्ही भव्य विजयोत्सवी मिरवणूक काढली होती. तेव्हापासून गेल्या साठ वर्षांत सार्वजनिक जीवनाशी जी नाळ जुळली, ती अद्याप अबाधित आहे आणि त्याच काळात पीटीआय मशिनवरील टेलिप्रिंटरच्या बातम्या पाहताना जी पत्रकारिता अंगी बाणली आणि भिनली ती अखंडित राहिली.

जनताजनार्दनाचा अकृत्रिम लोभ हेच त्याचे कारण! पत्रकारिता आणि सामाजिक कार्याचे बाळकडू आम्हाला बालपणीच मिळाले, ते 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव तथा ती. आबा यांच्याकडून. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा त्यांना सहवास मिळाला आणि म. गांधी यांचा संदेश मिळवून आबांनी तत्कालीन बहुजन समाज स्वातंत्र्य संग्रामात आणला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासमवेत मार्च १९३० मध्ये त्यांनी काळाराम मंदिर सत्याग्रहात भाग घेतला आणि त्यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. आंबेडकर यांचा मुंबईत दादरला दि. ५ सप्टेंबर १९४३ रोजी जाहीर सत्कारही झाला होता. १९४९ मध्ये नामनियुक्त आमदार असताना आबांनी कूळ कायदा बिलाचे समर्थन केले होते. कोल्हापुरातील प्रसिद्ध शेतकरी संघासह अनेक सहकारी संस्थांच्या उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. असा हा समृद्ध वारसा आम्हाला लाभला आणि आम्ही तो यशस्वीपणे पुढे नेला. ती. आबा यांनी मुंबईतून कोल्हापुरात आल्यावर 'पुढारी' दैनिक सुरू करताना प्रथमपासून सडेतोड आणि निर्भीड बाणा ठेवला आणि तत्कालीन अनेक प्रश्नांवर मर्मग्राही वृत्तांकन आणि लिखाण केले.

लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची अमोघ शक्ती आम्ही परखडपणे नेहमी हाताळली आणि राज्यकर्त्यांच्या चुकीच्या धोरणावर घणाघाती टीका केली. चुकीचे निर्णय बदलायला लावले. चार शब्दांपुरती लेखणी न वापरता आम्ही वेळोवेळी प्रत्यक्ष सार्वजनिक जीवनातही जनतेच्या प्रश्नांसाठी विविध लढ्यांत, आंदोलनांत जातीनिशी आघाडीवर राहिलो. पत्रकारिता आणि आमचे सार्वजनिक जीवन एकरूपच झाले आणि त्यातून 'पुढारी' हे लोकांचे हक्काचे व्यासपीठ बनले आणि 'पुढारी'नेही जनतेची नस लक्षात घेऊन सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडीत लोकांच्या अपेक्षा पूर्ण केल्या. एका बाजूला सार्वजनिक कार्यात सक्रिय सहभाग घेत असतानाच 'पुढारी'चा चेहरामोहरा बदलत जिल्हास्तरापासून राज्य वृत्तपत्रापर्यंत 'पुढारी'ने झेप घेतली. एकेकाळी मुंबई, पुण्याची वृत्तपत्रे कोल्हापूर, सांगली, सातार्यात येत; पण दक्षिण महाराष्ट्रातील 'पुढारी'ने मुंबई, पुणे, नाशिक, छ. संभाजीनगर आदी भागात आपला विस्तार केला. खिळे जुळविण्याच्या जमान्यात 'पुढारी'त मोनो मशिनवर टाईपसेटिंग होत असे. आम्ही एकाचवेळी सोळा पाने छापणारे आणि बहुरंगी छपाई करणारे अत्याधुनिक मुद्रण यंत्र आणले आणि 'पुढारी' आकर्षक रूपात प्रसिद्ध होऊ लागला. ए.पी. या जगभरातील रंगीत फोटो देणार्या संस्थेची सुविधा महाराष्ट्रात सर्वप्रथम 'पुढारी'ने घेतली. दररोज वेगवेगळ्या पुरवण्या, रविवारची 'बहार' यातून वाचकांना मेजवानीच मिळू लागली. गेल्या पस्तीस वर्षांपासून 'पुढारी'ने सुरू केलेले 'विश्वसंचार'चे पान दोन पिढ्यांचे आकर्षण बनले आहे. मूळ अंकाबरोबर स्थानिक वृत्तांना प्राधान्य देणारी चार पानी 'माय' हा 'पुढारी'चा प्रयोग. इतर अनेक वृत्तपत्रांनी 'पुढारी'च्या या बदलाची आणि पुरवण्यांची नक्कल केली.

'पुढारी'ची अशी भरारी सुरू असताना तेवढ्याच हिरिरीने आम्ही विविध सामाजिक उपक्रमांत आणि प्रश्नांत सक्रिय सहभाग घेतला. शिवराज्याभिषेक त्रिशताब्दी सोहळा आणि राजर्षी शाहू जन्मशताब्दी सोहळा यासाठी आम्ही पुढाकार घेतला आणि या देवोदुर्लभ शाही सोहळ्याला जवळजवळ सारे मंत्रिमंडळ उपस्थित होते. अंबाबाई मंदिरात पाच दलित दाम्पत्यांच्या हस्ते अभिषेक असो की, दलितांना जमीनवाटपाचा विषय असो, आम्ही पूर्वसुरींचा वारसा जपला. सीमा प्रश्नावर लिहिलेल्या जळजळीत अग्रलेखाने 'पुढारी'ची पेपर टॅक्सी बेळगावजवळ जाळली गेली; पण त्याची तमा न बाळगता सीमा प्रश्नासाठी आम्ही सातत्याने आवाज उठवला. एस. एम. जोशी, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अशा दिग्गजांसह कोल्हापुरात भव्य सीमा परिषद भरविली आणि या प्रश्नाचा आवाज बुलंद केला. कच्छ (भूज), किल्लारी भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीत 'पुढारी'च्या माध्यमातून आम्ही नेहमीच मदतनिधी उभा केला. कोल्हापूरवर अन्यायाने लादलेला टोल रद्द करण्यासाठी 'पुढारी'ने सर्वप्रथम आवाज उठवला. आम्ही जातीने रस्त्यावर आंदोलनात उतरलो आणि अखेर टोल रद्द झाला.

मराठा आरक्षणासाठी झालेल्या प्रदीर्घ आंदोलनात आम्ही आघाडीवर होतो आणि कोल्हापुरात नुकत्याच स्थापन झालेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचची सर्वप्रथम मागणी आम्ही १९७४ मध्ये अग्रलेखातून केली. त्याचा सातत्याने पाठपुरावा केला आणि त्याला यश आले. १९९९ मध्ये कारगील युद्धावेळी सियाचीन या उत्तुंग रणभूमीवर केवळ उपचारांची सुविधा नसल्याने शूर जवानांच्या प्राणांवर बेतते, हे समजताच आम्ही तातडीने स्वनिधीसह अडीच कोटी रुपयांचा लोकनिधी उभारला आणि सियाचीन हॉस्पिटलची उभारणी झाली. या हॉस्पिटलमध्ये गेल्या २३ वर्षांत ५ लाखांहून अधिक जवानांना उपचारांची सुविधा मिळाली. जवानांना संजीवनीच लाभली. या हॉस्पिटलच्या रूपाने हिमालयावर कोल्हापूरचा झेंडा फडकला आहे. गेल्या साठ वर्षांत चौदा पंतप्रधान, अठरा मुख्यमंत्र्यांसह अनेक नेते, राजकारणी, उद्योगपती, शिक्षणमहर्षी, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, कलाकार अशा असंख्यांचा सहवास लाभला. स्व. पंतप्रधान राजीव गांधी यांच्याशी जसे दृढ संबंध आले, तसे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी अतूट मैत्र जुळले. 'पुढारी'च्या सुवर्ण महोत्सवासाठी स्व. राजीव गांधी आणि अमृत महोत्सवासाठी नरेंद्र मोदी प्रमुख पाहुणे म्हणून आवर्जून उपस्थित होते आणि उभयतांनीही 'पुढारी'च्या सामाजिक बांधिलकीचा उत्स्फूर्त गौरव केला होता. वृत्तपत्राच्या दोन समारंभांना दोन पंतप्रधानांची प्रमुख उपस्थिती लाभण्याचा भारतीय वृत्तपत्रसृष्टीत असा योग क्वचितच आला असावा.

'पुढारी'च्या अगणित वाचकांच्या, हितचिंतकांच्या, सुहृदांच्या असीम प्रेमभावामुळेच 'पुढारी'ला भरारीचे पंख लाभले. प्रिंटबरोबर टी. व्ही., एफ.एम. रेडिओ, डिजिटल, डिजिटल होर्डिंग आणि इव्हेंट अशा माध्यमांच्या सर्वच क्षेत्रांत 'पुढारी' समूहाने आपला ठसा उमटवला आहे. आमचे चिरंजीव योगेश कौशल्याने ही माध्यमे यशस्वीपणे सांभाळीत आहेत. ऐंशीव्या वाढदिवसानिमित्त नागरी गौरव समितीने आमचा सत्कार आयोजित केला आहे. या सहस्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त 'सिंहायन' या आमच्या आत्मचरित्र ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे. 'आनंदाचे डोही, आनंद तरंग' अशी आमची भावस्थिती आहे. आम्ही जनताजनार्दनाप्रति कृतज्ञ आहोत. त्यांच्यामुळेच आम्ही कृतार्थ झालो आहोत, अशा आमच्या नम्र भावना आहेत.

# खून करणाऱ्या गुन्हेगाराला फाशीच हवी

आपल्या देशात निर्दयीपणे लोकांचे खून करणाऱ्या गुन्हेगारांची संख्या दिवसे दिवस वाढत आहे. ढेकूण किंवा पीसू यांना जसे चेंगरून मारले जाते. तशाच प्रकारे येथे दिवसा ढवळ्या गोळ्या घातल्या जात आहेत तर कधी कोयत्याचे सपासपवार करून ठार करून गुन्हेगार पसार होत आहेत. लोकांच्या मनामध्ये कसल्याही प्रकारची भीती उरलेली नाही. पोलिस गुन्हेगारांना पकडून न्यायालया समोर हजर करून त्यांना जेलमध्ये खडी फोडायला लावले जात असते. आज ना उद्या त्यांना फाशीची शिक्षा होईल असे आपणास वाटत असते. पण न्यायालयात लाखो केसेस प्रलंबित आहेत.

त्यामुळे त्यांचे निकाल लवकर लागत नाहीत कित्येक वर्षे त्यात जात असतात. त्या गुन्ह्यातील सर्व हवाच निघून गेल्याचा भास होत असतो. त्यामुळे गुन्हेगार निरडावले जात आहेत. खुनाचे गुन्हेगाराला फाशीच होईल असे आपणास वाटत असते. पण वास्तव वेगळेच असते त्या विषयी आजच दिनांक ५ नोव्हेंबर २०२५ रोजी वाचनात आले ते असे की, फाशी की इंजेक्शन ? अलीकडे सर्वोच्च न्यायालयात मृत्युदंडाची अंमलबजावणी कशाप्रकारे केली जाते. या विषयावर मोठी चर्चा रंगली. याचे कारण यासंदर्भात दाखल करण्यात आलेली एक जनहित याचिका.

या याचिकेत असा मुद्दा मांडण्यात आला आहे की ,मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आलेल्या गुन्हेगारांना फाशी देण्याऐवजी लिथल इंजेक्शन दिले जावे, जेणेकरून मृत्यूच्या वेळी त्यांच्या वेदना कमी होतील. वकील ऋषी मल्होत्रा यांनी २०१७ मध्ये यासंदर्भात याचिका दाखल केली होती. त्यांचे म्हणणे आहे की फाशीच्या प्रक्रियेत मृत्यू होण्यासाठी ३० ते ४० मिनिटे लागत असून ती अत्यंत वेदनादायी असतात. त्याऐवजी इंजेक्शन दिल्यास मृत्यू तात्काळ होतो आणि यातनाही कमी होतात. अमेरिकेतील ४९ राज्यांनी ही पद्धत स्वीकारल्याची त्यांनी निदर्शनास आणून दिले.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. सरकारच्या वतीने वरिष्ठ वकील सोनिया माथूर यांनी याबाबतचा युक्तिवाद करताना असे म्हटले आहे की ,मृत्युदंडाची पद्धत बदलणे हे न्यायालयाचे नव्हे तर सरकारचे धोरणात्मक अधिकार क्षेत्र आहे. सरकारच्या मते इंजेक्शनचा पर्याय व्यवहार्य नाही. तथापि ,या भूमिकेवर सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त करत सरकार या संवेदनशील विषयावर बदलासाठी तयार नसल्याबाबत ताशेरे ओढले आहेत. न्यायालयीन चर्चेच्या पलीकडे हा प्रश्न आता केवळ कायदेशीर न राहता नैतिक आणि मानवी संवेदनशीलतेचा झाला आहे.

एका लोकशाही राष्ट्राने आपल्या नागरिकाला जीवनदान देण्याऐवजी मृत्यूदंडाचा निर्णय घेण्याचा अधिकार किती योग्य आहे ,असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सर्वात धक्कादायक म्हणजे मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आलेल्यापैकी ९० टक्क्याहून अधिक कैदी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा अल्पसंख्यांक घटकांतील आहेत. या असमानतेमुळे न्यायव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होतो, असे काहींचे म्हणणे आहे. या मागचे कारण, कायदा सर्वांसाठी समान असावा अशी संविधानाची अपेक्षा आहे ,पण वास्तवात सामाजिक आणि आर्थिक दर्जानुसार न्यायाचा तराजू हलताना दिसतो अशी टीका केली जाते.

कठोर शिक्षा दिल्यास समाजात भय निर्माण होते आणि गुन्हे कमी होतात. पण भारतात याबाबत उलट चित्र दिसते. मृत्युदंडाच्या शिक्षा ठोठावण्यात येऊनही हत्या आणि बलात्काराच्या गुन्ह्यात घट झाली नाही. हाच धागा पकडून फाशी किंवा मृत्युदंड हा गुन्ह्यांना आळा घालण्यास प्रभावी नाही अशी मांडणी केली जाते. पण या शिक्षेचा प्रभाव समाजावर न पडण्याचे कारण म्हणजे आपल्याकडे शिक्षा ठोकवल्यानंतर तात्काळ त्याची अंमलबजावणी केली जात नाही. त्यामुळे बलात्कार ,दहशतवादी हल्ला यासारखे विषय जेव्हा ज्वलंत ठरलेले असतात तेव्हा लोकांचा कायद्याकडून भ्रमनिरास होतो.

काही प्रकरणात तर फाशीची शिक्षा सुनावण्यात येऊनही अनेक वर्षानंतर दयेचा अर्ज मंजूर करून आरोपींना सोडण्यात येते किंवा त्यांची शिक्षा बदलण्यात येते. अशा घटनांमुळे फाशीच्या शिक्षेचे गांभीर्य कमी होत गेले आहे. संयुक्त राष्ट्र संघानेही अनेक वेळा जगभर मृत्यूदंडाला स्थगिती देण्याची शिफारस केली आहे. न्याय हा केवळ प्रतिशोधासाठी नसावा. न्यायाचे उद्दिष्ट समाजात सुधारणा आणि पुनर्निर्मिती असावे. मृत्युदंड दिल्यास गुन्हेगाराला सुधारणेची कोणतीही संधी दिली जात नाही, असे मत यासंदर्भात मांडले जाते. केंद्र सरकारने अलीकडे न्यायव्यवस्थेत काही सुधारणा केल्या आहेत.

त्यानुसार दया याचिकेवर केवळ निर्णय घेण्यासाठी १८ महिन्याची मर्यादा ठेवली आहे , जेणेकरून कैदी अनिश्चित काळ प्रतीक्षेत राहू नयेत. हा एक सकारात्मक बदल आहे .पण आता सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार येत्या काळात फाशीच्या शिक्षेबाबत सरकार ,० पुनर्वसनबदलाची भूमिका घेणार का हे पहावे लागेल. जगातील बहुसंख्य लोकशाही राष्ट्रांनी मृत्यूदंड रद्द केला असून तेथे गुन्हेगारीत वाढ झालेली नाही. उलट शिक्षण ,पुनर्वसन आणि सामाजिक न्यायाच्या धोरणामुळे गुन्हे कमी झाले आहेत. त्यामुळे मृत्युदंड रद्द करणे म्हणजे गुन्ह्यांना प्रोत्साहन देणे नाही ; तर मानवी मूल्यांची प्रतिष्ठा जपणे आहे ,असे फाशीची शिक्षा नको असे म्हणणाऱ्या वर्गांचे म्हणणे आहे.

यासंदर्भातील दोन मतप्रवाहांचा विचार पाहता ,फाशीची शिक्षा असावी की नसावी याबाबत एकदाच व्यापक मंथन होण्याची गरज आहे हे निश्चित. पण लिटल इंजेक्शनचा जो पर्याय सध्या पुढे आला आहे तोही वेदनादायी नाहीये असे मानण्याचे कारण नाही. वैद्यकीय तज्ञांचे म्हणणे आहे की जर या प्रक्रियेमध्ये सदर व्यक्ती पूर्णपणे बेशुद्ध झाली नाही तर तिला प्रचंड वेदना होऊ शकतात काही प्रकरणांमध्ये असे दिसूनही आले आहे, तसेच लिथल इंजेक्शन हे वेदनारहीत नसतेच. ज्या अमेरिकेत याचा वापर केला जातो तेथील संविधानानुसारही कैद्याला वेदनारहित मृत्यूची हमी दिलेली नाही.

त्यामुळे भारत सरकारचे म्हणणे आहे की फाशीच्या पर्यायाचा विचार करता येईल, पण सध्या लिथल इंजेक्शनसारख्या तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या आणि महागड्या प्रक्रियेचा अवलंब करणे व्यवहार्य नाही. म्हणूनच, भारतात सध्या फाशी हीच मृत्यूदंडाची एकमेव कायदेशीर पद्धत कायम ठेवण्यात आली आहे. * भारतीय दंडसंहितेनुसार हत्या, बलात्कारासह हत्या दहशतवादी कारवाया यासारख्या अत्यंत गंभीर आणि दुर्मिळातील दुर्मिळ गुन्ह्यासाठी मृत्यूदंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. १९८० मध्ये बच्छनसिंग विरुद्ध पंजाब राज्य या ऐतिहासिक घटल्यात सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला होता की मृत्युदंड हा दुर्मिळातील दुर्मिळ म्हणजे नेमके काय ,याचे एकसंघ मोजमाप किंवा ठोस निकष आजपर्यंत ठरविण्यात आला नाही.

त्यामुळे अनेकदा एका न्यायालयात गंभीर गुन्ह्यासाठी मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली जाते, तर दुसऱ्या न्यायालयात त्याच गुन्ह्यासाठी आजीवन कारावासाची शिक्षा सुनावली जाते.* जगातील १४४ देशांनी मृत्यू दंडाची शिक्षा पूर्णपणे रद्द केली आहे. केवळ ५५ देशांमध्ये तो अद्याप अस्तित्वात असून यापैकी बहुतांश देश आशिया आणि मध्यपूर्वेतील आहेत. चीन ,इराण ,सौदी अरेबिया , इजिप्त आणि अमेरिका हे देश अजूनही मृत्युदंड देतात. भारतात मृत्युदंडाची शिक्षा अस्तित्वात असली तरी त्याचा वापर अत्यंत मर्यादित आहे. शेवटची चर्चित फाशी २०२० मध्ये निर्भया बलात्कार प्रकरणातील दोषींना देण्यात आली होती.

पण भारतात मृत्युदंड हा प्रत्यक्ष न्यायापेक्षा प्रतीकात्मक अधिक झाला असून कायदे किती कठोर आहेत हे दाखवण्यासाठी ही शिक्षा दिली जाते, अशी टीका होते. वास्तविक, कोणत्याही कायद्या मागचा हेतूच मुळात तो असतो. * मनेस्टी इंटरनॅशनलच्या अहवालानुसार २०२४ मध्ये भारतातील कनिष्ठ न्यायालयांनी एकूण १३९ जणांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली असून ती मागील वर्षाच्या तुलनेत १४ टक्क्यांनी अधिक आहे. पण यातील बहुसंख्य आरोपी गरीब, सामाजिकदृष्ट्या मागास किंवा अल्पसंख्यांक समुदायातील आहेत. नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी , दिल्लीच्या प्रोजेक्ट ३९अ या अहवालानुसार मृत्युदंड ठोठावलेल्या पैकी सुमारे ७४ % कैदी आर्थिक दृष्ट्या दुर्बल आहेत, तर ७६ टक्के आरोपीकडे उच्च शिक्षण नाही.

* भारतामध्ये मृत्युदंड ठोठावलेल्या अनेक कैद्यांना फाशीच्या शिक्षेची प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्यासाठी अनेक वर्षे लागतात. ही केवळ शिक्षा नाही, तर मानसिक छळ आहे असे मानवाधिकारवाद्यांचे म्हणणे आहे. आजघडीला देशातील ५६ % हून अधिक कैदी पाच वर्षाहून अधिक काळ फाशीच्या प्रतीक्षेत आहेत. या काळात त्यांचे मनोबल खचते, उद्ध्वस्त होते आणि कायदा त्यांच्यावर मरण्यापूर्वीच मरण्याची वेळ आणतो. सर्वोच्च न्यायालयाने अशा विलंबा बद्दल अनेक वेळा सरकारकडे नाराजी व्यक्त केली आहे. वरील वास्तव वाचल्यानंतर प्रत्येकाची इच्छा असणार की, खून करणाऱ्या गुन्हेगाराला फाशीच हवी

*********

लेखक
जी.एस.कुचेकर पाटील
भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा
मो.न. ७५८८५६०७६१

# आगीशी खेळ नको

केंद्रशासित प्रदेश लडाखमध्ये काही दिवसांपासून शांततापूर्ण मार्गाने आंदोलन सुरू होते. बुधवारी लेहमध्ये त्याला अचानक हिंसक वळण लागले. दगडफेक आणि जाळपोळ झाली. हिंसाचारात ४ जणांचा मृत्यू झाला आणि जवळपास ८० जण जखमी झाल्याच्या बातम्या आहेत. लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा द्यावा अशी येथील लोकांची मागणी आहे. या क्षेत्राचा सहाव्या अनुसूचीमध्ये समावेश केला जावा अशीही मागणी आहे. शांततापूर्ण आंदोलनाचा अचानक भडका उडाला.

त्यात ज्या प्रकारे काही ठिकाणांना लक्ष्य केले गेले ते पाहता यात राजकारणाचा वास येतो आहे. राजकारण असावे, मात्र कुठे आणि कोणत्या वेळी याचे तारतम्य असावे. अन्यथा हा प्रकार आपण ज्या फांदीवर बसलो आहे ती फांदीच कापण्याचा शेखचिल्ली प्रकार होतो. बरे त्यावेळी शेखचिल्ली एकटा पडणार होता, येथे लडाखचे भौगोलिक स्थान आणि त्या परिसरातील संवेदनशीलता लक्षात घेता किती जबाबदारीने वागले पाहिजे याची काळजी घ्यायला हवी आहे.




देशाच्या सुरक्षिततेलाच धोका निर्माण होईल असा आगीशी खेळ करण्याची आवश्यकता नाही. वास्तविक आपल्या मागण्यांसाठी लडाख अपेक्स बॉडी अर्थात 'एलएबी'चे उपोषण सुरू होते. उपोषणात बसलेल्या दोन महिलांची प्रकृती अचानक बिघडली आणि त्यांना रूग्णालयात दाखल करावे लागले. त्यामुळे युवक भडकले. लडाखमध्ये स्वतंत्र विधानसभेचीही एलएबी आणि संबंधितांची मागणी आहे. लडाखमध्ये त्यांना स्वतंत्र लोकसेवा आयोग हवा आहे आणि लोकसभेच्या लेह आणि कारगिल अशा दोन स्वतंत्र जागाही हव्या आहेत. बर्याच काळापासून या मागण्या आहेत. केंद्र सरकारने यासंदर्भात बोलणीसाठी ६ ऑक्टोबर ही तारीख निश्चित केली होती. आता म्हणजे २६ सप्टेंबरला ही चर्चा होण्याची शक्यता होती.

तथापि, त्याच्या अगोदरच हिंसाचार भडकला. तोडफोड आणि पेटवापेटवी झाली. केंद्रातील सत्ताधारी पक्षाने केंद्रातीलच प्रमुख विरोधी पक्षाकडे बोट दाखवत कारस्थानाचा संशय व्यक्त केला आहे. विरोधकांना शेजारी देश नेपाळसारखी परिस्थिती हवी असल्यामुळे असे घडवले गेले असा गंभीर आरोप त्यांनी केला. आंदोलन भलेही एलएबी आणि कारगिल डेमोक्रेटिक अलायन्स यांच्या नेतृत्वाखाली होत असले तरी सूत्रधार वेगळे आहेत. लडाखमधील पर्यावरण आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या हातात दोर्या असल्याचे मानले जाते. वांगचुक पहिल्यापासूनच या विषयावर सातत्याने व्यक्त होत आले आहे. त्यांनी जे काही केले ते लोकशाहीच्या चौकटीत आणि शांततेने केले. त्यांच्या मागण्यांना, भूमिकेला आणि अगदी उपोषणालाही कोणाचा आक्षेप नव्हता आणि त्याचे काही कारणही नव्हते.

मात्र बुधवारच्या घटना पाहता आंदोलन त्यांच्या नियंत्रणात राहिले नसल्याचे दिसते. जे राजकीय पक्ष प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष आंदोलनाला वेगळ्या दिशेने घेऊन गेले त्यांना वांगचुक रोखू शकले नाहीत हे स्पष्ट आहे. हिंसाचार भडकल्यानंतर त्यांनी उपोषण मागे घेतले आणि शांततेचे आवाहन केले हे चांगले. तथापि, हा तरूणांचा राग होता आणि ही जेन–झेड क्रांती होती हे जे त्यांनी म्हटल्याचे काही माध्यमांच्या बातम्यांनी दर्शवले आहे ते लक्षवेधी ठरले आहे. नेपाळमधील किंवा त्यापूर्वीचा बांगलादेश आणि श्रीलंकेतील घटनाक्रम ताजा आहे. नेपाळमध्ये जेव्हा मागच्या पंधरवड्यात अचानक अराजकासारखी स्थिती निर्माण झाली होती त्यावेळी भारतातील काही प्रमुख आणि प्रबळ राजकीय पक्षांनी आणि नेत्यांनीही भारताच्या संदर्भात इशारे देणारी विधाने केली होती.

वांगचुक यांची प्रतिक्रियाही त्याच दिशेने जाणारी आहे असे मानले तर ते चुकीचे ठरणार नाही. केंद्रातील सत्ताधारी जरी विरोधी पक्षाकडे निर्देश करत असले तरी त्या पक्षाची लडाखमध्ये एवढी ताकद नाही असेही वांगचुक यांचेच म्हणणे आहे. एकीकडे हिंसाचाराचा निषेध करताना दुसरीकडे लोकांचा संतापही न्याय्य असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे स्वत: वांगुचकच संशयाच्या भोवर्यात आले आहेत. त्याचे कारण काही जणांच्या मते वांगुचक यांनीच अगोदर युवकांना भडकवले आणि नंतर त्यांनीच शांततेसाठी आवाहन केले. त्यांची दुटप्पी भूमिका अयोग्य आहे. नॅशनल कॉन्फन्सने केंद्र सरकारलाच जबाबदार धरले आहे. सरकारने दिलेला शब्द पाळला नाही त्यामुळे ही स्थिती उद्भवल्याचे पक्षाचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे लेहमधील हिंसाचाराच्या अगदी काही तास अगोदर याच पक्षाचे जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी खळबळजनक आरोप केला होता.

काश्मीरमध्ये जोपर्यंत भारतीय जनता पार्टीचे सरकार येत नाही तोपर्यंत काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा मिळणार नाही, असे ते म्हणाले. उमर यांनी विधानसभा निवडणुकीत त्यांच्या मतदारांना पूर्ण राज्याचे आश्वासन दिले होते. केंद्राने अद्याप त्या दिशेने हालचाल केली नाही. महत्त्वाचे म्हणजे हा विषय सर्वोच्च न्यायालयातही आहे. न्यायालयानेही केंद्राच्या भूमिकेशी सुसंगत अशीच भूमिका घेत काश्मीरमध्ये एकतर्फी कोणता आदेश जारी केलेला नाही. त्यानंतर लेहमध्ये अचानक हिंसाचार घडत असेल तर सर्व संबंधित पैलूंचा विचार करणेही क्रमप्राप्त ठरते. लडाखच्या संदर्भात आणखी एक सांगाचे तर ते जेव्हा जम्मू काश्मीरचा भाग होते, तेव्हा त्यांना लडाख हा केंद्रशासित प्रदेश हवा होता.

आता तसा तो झाला तर पूर्ण राज्याच्या मागणीवर जोर दिला जातो आहे. त्यांच्या सगळ्या मागण्या अवास्तव नाहीत. देशातील कोणत्याही प्रदेशातील नागरिकांना आणि त्यांचे नेतृत्व करणार्या संघटना आणि व्यक्तींना आपल्या मागण्या मांडण्याचा आणि त्यांच्या पूर्ततेसाठी आंदोलन करण्याचा निश्चितच अधिकार आहे. मात्र हे सगळे चौकटीत आणि शांततेत राहिले पाहिजे. आपले भौगोलिक स्थान आणि तेथील अतिसंवेदनशीलतेचा त्यांनीच विचार केला पाहिजे. अनावश्यक अस्थिर वातावरण तयार करून धोक्याचे भूत उभे करण्यात अर्थ नसतो.

# दिवाळीतील धावपळीमुळे चेहऱ्यावर थकवा वाढला आहे? मग 'या' पद्धतीने त्वचेवर लावा दही फेसपॅक, सौंदर्यात पडेल भर

दिवाळी सणाला सगळ्यांची खूप जास्त धावपळ होते. कुटुंबातील सदस्य, नातेवाईक, पाहुणे मंडळींच्या स्वागतामध्ये संपूर्ण वेळ निघून जातो.याशिवाय दिवसभर काम करत राहिल्यामुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. आरोग्यासोबतच चेहऱ्याकडे जास्त लक्ष दिले जात नाही. पण या सगळ्याचा थकवा दिवाळी झाल्यानंतर चेहऱ्यावर लगेच दिसून येतो. अपुऱ्या झोपेमुळे डोळ्यांखाली वाढलेली काळी वर्तुळ, चेहऱ्यावरील पिंपल्स, ऍक्ने, फोड इत्यादी अनेक समस्यांमुळे त्वचा निस्तेज आणि काळवंडल्यासारखी वाटू लागते. चेहऱ्यावर वाढलेला थकवा कमी करण्यासाठी महिला वेगवेगळ्या स्किन केअर प्रॉडक्टचा वापर करतात. पण यामुळे चेहऱ्यावर ग्लो येण्याऐवजी त्वचा आणखीनच निस्तेज होऊन जाते.



त्वचेसंबंधित समस्या उद्भवू लागल्यानंतर महिला बाजारातील महागडे स्किन केअर प्रॉडक्ट, वेगवेगळ्या क्रीम, लोशन किंवा सीरमचा वापर करतात. या गोष्टींचा परिणाम चेहऱ्यावर जास्त दिवस दिसून येत नाही. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला चेहऱ्यावरील काळेपणा आणि थकवा कमी करण्यासाठी दह्याचा कशा पद्धतीने वापर करावा, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. दही त्वचा हायड्रेट राहते. घरगुती पदार्थांच्या वापरामुळे चेहऱ्यावर नैसर्गिक ग्लो येतो आणि त्वचा अधिकच सुंदर दिसते.

चेहऱ्यासाठी 'या' पद्धतीने करा दह्याचा वापर: दह्याचा वापर केल्यामुळे त्वचा हायड्रेट राहते. याशिवाय चेहऱ्यावरील कमी झालेला ग्लो पुन्हा येतो. वाटीमध्ये बेसन आणि दही मिक्स करून एकत्र पेस्ट करून घ्या. तयार केलेली पेस्ट संपूर्ण चेहऱ्यावर लावून ठेवा. त्यानंतर हलक्या हाताने मसाज करा. यामुळे चेहऱ्यावर झालेली डेड स्किन कमी होण्यास मदत होईल. हा फेसपॅक आठवड्यातून दोनदा चेहऱ्यावर लावल्यास त्वचा अधिक सुंदर आणि चमकदार होईल.

वाटीमध्ये दही घेऊन त्यात तांदळाचे पीठ मिक्स करा. तयार केलेली पेस्ट चेहऱ्यावर आणि मानेवर लावून काहीवेळ तसेच ठेवा. त्यानंतर हलक्या हाताने मसाज करा. यामुळे चेहऱ्यावर जमा झालेली घाण, धूळ, माती स्वच्छ होईल. तांदळाच्या पिठात असलेल्या गुणधर्मांमुळे त्वचा स्वच्छ होते आणि चेहऱ्यावर ग्लो येतो.

ओठांवरील मऊपणा वाढवण्यासाठी 'हे' घरगुती पॅक ठरतील प्रभावी, थंडगार वातावरणात ओठ राहतील कायमच गुलाबी

दह्यामध्ये चमचाभर कोरफड जेल मिक्स करा. तयार केलेली पेस्ट चेहऱ्यावर चोळून नंतर पाण्याने त्वचा स्वच्छ धुवा. यामुळे चेहऱ्यावरील ओलावा कायम टिकून राहील. सगळ्यात शेवटी पपई आणि टोमॅटोचा रस एकत्र मिक्स करून चेहऱ्यावर लावा. हे उपाय केल्यामुळे त्वचेवर ग्लो येईल आणि चेहऱ्यावर जमा झालेली डेड स्किन कमी होण्यास मदत होईल.

## हिवाळ्यात हा एक लाडू खाल तर संपूर्ण शरीर होईल बळकट, गुडघे, पाठ आणि सांधेदुखीपासून मिळेल आराम

हिवाळा सुरू झाला की आपल्या आहारात असे पदार्थ समाविष्ट करावे लागतात जे शरीराला उबदार ठेवतात आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. अशा पदार्थांमध्ये मेथीचे लाडू (Fenugreek Ladoo) हे एक पारंपरिक आणि पौष्टिक पर्याय आहे. आपल्या आजी-आजोबांच्या काळापासून हे लाडू हिवाळ्यात खाल्ले जातात कारण ते शरीराला ताकद देतात, सांध्यातील वेदना कमी करतात, आणि हिवाळ्यात होणाऱ्या सर्दी-खोकल्यापासून संरक्षण करतात.

मेथीच्या दाण्यांमध्ये आयर्न, फायबर, प्रोटीन, कॅल्शियम आणि इतर पोषक तत्वे मुबलक प्रमाणात असतात. हे लाडू प्रसूतीनंतर महिलांसाठीही अत्यंत फायदेशीर मानले जातात. त्यात वापरलेले तूप, खजूर, सुका मेवा आणि गूळ हे सर्व घटक शरीराला ऊर्जा देतात. चला तर पाहूया घरच्या घरी पौष्टिक आणि चविष्ट मेथीचे लाडू कसे बनवायचे.

साहित्य:

मेथीचे दाणे – १ कप

गव्हाचे पीठ – २ कप

तूप – १ कप (लाडूसाठी थोडं जास्त लागतं)

गूळ – १ ट कप (किसून घेतलेला)

खजूर (बारीक चिरलेले) – १/२ कप

सुके मेवे (बदाम, काजू, अक्रोड) – १/२ कप

खोबरे (खवलेले, भाजून घेतलेले) – १/४कप

खसखस – २ टेबलस्पून



वेलदोडा पूड – १ टीस्पून

सकाळच्या नाश्त्यासाठी, टिफिन तसेच प्रवासासाठी परफेक्ट आहे 'व्हेज कोल्ड सँडविच'; जाणून घ्या रेसिपी

कृती :

यासाठी सर्वप्रथम मेथीचे दाणे कोरड्या कढईत मंद आचेवर भाजून घ्या जोपर्यंत सुगंध येतो. नंतर ते थंड करून मिक्सरमध्ये बारीक पूड करा.

एका जाड तळाच्या कढईत थोडं तूप घालून गव्हाचं पीठ मंद आचेवर सोनेरी होईपर्यंत भाजा. हे पाऊल लाडूंना उत्तम चव आणि सुगंध देतं.

बदाम, काजू आणि खोबरे थोडंसं भाजून घ्या, त्यामुळे त्यांचा सुगंध आणि चव वाढते.

कढईत थोडं तूप घालून गूळ वितळवा. एकसंध पाक तयार होऊ द्या (खूप घट्ट नाही, मध्यम).

भाजलेले गव्हाचे पीठ, मेथीची पूड, सुका मेवा, खजूर, खोबरे, खसखस आणि वेलदोडा पूड हे सर्व मोठ्या भांड्यात एकत्र करा.

तयार केलेला गूळाचा पाक आणि उरलेले तूप या मिश्रणात टाका आणि नीट एकत्र करा. हाताला लागणारं तूप थोडं लावून मिश्रण मऊ करा.

मिश्रण अजून गरम असतानाच हाताने लहान गोल लाडू वळा. थंड झाल्यावर हवाबंद डब्यात साठवा.

मेथीचा कडवटपणा कमी करण्यासाठी दाणे रात्रीभर भिजवून दुसऱ्या दिवशी भाजू शकता.

हे लाडू हिवाळ्यात रोज सकाळी एक खाल्ल्यास शरीराला ताकद मिळते.

तुम्ही गूळाऐवजी साखर न वापरणं चांगलं, कारण गूळ जास्त पौष्टिक असतो.

मेथीचे लाडू हे केवळ एक गोड पदार्थ नाहीत तर आरोग्यासाठी एक अमृतसमान नैसर्गिक उपाय आहेत. हिवाळ्यात या लाडूंनी तुमचं शरीर आतून गरम, मजबूत आणि ऊर्जावान ठेवा!

# पेपराइतकीच पातळ, मऊ, रेस्टॉरंट-स्टाईल 'रुमाली रोटी' घरी कशी तयार करायची? नोट करा रेसिपी

भारतीय जेवणात विविध प्रकारच्या रोट्या, पराठे आणि भाकऱ्या आढळतात. पण त्यापैकी एक खास आणि रेस्टॉरंट-स्टाईल रोटी म्हणजे रुमाली रोटी. नावाप्रमाणेच ही रोटी अतिशय पातळ, मऊ आणि लवचिक असते अगदी रुमालासारखी! म्हणूनच तिला रुमाली रोटी म्हणतात. उत्तर भारतातील मुगलई आणि पंजाबी पदार्थांसोबत ही रोटी सर्व्ह केली जाते, विशेषतः बटर चिकन, पनीर बटर मसाला, किंवा कोरमा सारख्या रिच ग्रेव्ही डिशेससोबत.





रुमाली रोटीची खासियत म्हणजे तिची बनवण्याची पद्धत. ती मोठ्या आकारात पातळ लाटली जाते आणि तिला उलट्या कढईवर (किंवा तांब्या सारख्या पृष्ठभागावर) झटपट शेकले जाते. त्यामुळे ती हलकी, मऊ आणि सुगंधी लागते. घरच्या घरीही ही रोटी अगदी सहज तयार करता येते. फक्त थोडं संयम आणि योग्य टेक्निक गरजेची असते. चला तर मग घरच्या घरी रुमाली रोटी बनवण्याची पद्धत जाणून घेऊया.

साहित्य :

मैदा – २ कप

गव्हाचं पीठ – ट कप (ऑप्शनल, मऊपणा वाढवण्यासाठी)

मीठ – ट टीस्पून

तेल – १ टेबलस्पून

कोमट पाणी – आवश्यकतेनुसार

कोरडा मैदा – लाटण्यासाठी

वाटीभर रव्याचा वापर करून सकाळच्या नाश्त्यासाठी सोप्या पद्धतीमध्ये इंस्टंट रव्याचे आप्पे, नोट करून घ्या रेसिपी

कृती :

यासाठी सर्वप्रथम एका मोठ्या भांड्यात मैदा, गव्हाचं पीठ आणि मीठ घाला. थोडं थोडं कोमट पाणी घालत मऊ आणि लवचिक पीठ मळा. शेवटी त्यावर तेल घालून पुन्हा मळून घ्या. ओलसर कपड्याने झाकून ३० मिनिटे विश्रांती द्या.

पीठ थोडं मळून छोटे-छोटे गोळे बनवा. प्रत्येक गोळ्याचा आकार लिंबाएवढा ठेवा.

पाटावर थोडा कोरडा मैदा पसरवा आणि गोळा अगदी पातळ लाटा. रोटी जितकी पातळ असेल तितकी ती रुमाली रोटीला शोभेल.

एका मोठ्या उलटलेल्या कढईला गॅसवर ठेवा आणि ती मध्यम आचेवर गरम करा. कढईचा पृष्ठभाग गुळगुळीत आणि स्वच्छ असावा.

गरम झालेल्या कढईवर रोटी हलक्या हाताने टाका. काही सेकंदात रोटीवर छोटे फुग दिसतील. मग ती उलटवा आणि दुसऱ्या बाजूनेही काही सेकंद शेकून घ्या. रोटीला भाजू देऊ नका , ती फक्त मऊ आणि पातळ राहिली पाहिजे.

तयार रोटी गरम असतानाच रुमालासारखी दुमडून ठेवा.

ही मऊ आणि सुगंधी रोटी गरम गरम सर्व्ह करा, ही रोटी पनीर बटर मसाला, डाळ मखनी किंवा चिकन

ग्रेव्हीसोबत अप्रतिम लागते.

रोटी पातळ लाटताना मैदा कमी वापरा, नाहीतर ती कोरडी होईल.

कढई खूप गरम किंवा थंड नको , मध्यम तापमानच योग्य.

हवे असल्यास पीठात थोडं दूध मिसळल्याने रोटी अजून मऊ होते.

रुमाली रोटी ही भारतीय पाककलेतील एक अद्वितीय रोटी आहे जी हलकी, मऊ आणि चवदार लागते. ती घरच्या घरी तयार केल्यावर रेस्टॉरंटसारखा अनुभव मिळतो. पुढच्या वेळी तुम्ही खास पाहुण्यांसाठी डिनर बनवत असाल, तर या रुमाली रोट्या नक्की करून पाहा.

## बेकरीसारखा 'लादी पाव' घरी कसा तयार कसायचा? जाणून घ्या सोपी रेसिपी

भारतीय स्वयंपाकघरातील एक अतिशय लोकप्रिय आणि रोजच्या वापरातील पदार्थ म्हणजे लादी पाव. मुंबईच्या स्ट्रीट फूड संस्कृतीचा हा एक अविभाज्य भाग आहे. वडापाव, मिसळपाव, पावभाजी, मसाला पाव अशा असंख्य पदार्थांची जान म्हणजे हा मऊ, लुसलुशीत पाव! बाजारातून विकत आणलेले पाव चविष्ट असतात, पण त्यामध्ये प्रेझर्व्हेटिव्हज आणि रासायनिक घटक असतात. त्यामुळे घरच्या घरी तयार केलेले होममेड लादी पाव केवळ चवदारच नाहीत, तर आरोग्यदायी आणि ताजेही असतात. घरच्या ओव्हनमध्ये किंवा गॅसवरसुद्धा बेकरीसारखे लादी पाव सहज तयार करता येतात. थोडं संयम, थोडं प्रेम आणि योग्य प्रमाणात साहित्य वापरलं तर तुमच्या स्वयंपाकघरातून येणारा सुगंध सर्वांना भुरळ घालेल. या रेसिपीच्या मदतीने तुम्ही घरीच फ्रेश पाव तयार करू शकता. चला तर मग घरच्या घरी लादी पाव तयार करण्यासाठी लागणारे साहित्य आणि कृती जाणून घेऊया. साहित्य: मैदा – ३ कप कोमट दूध – १ कप साखर – २ टेबलस्पून ड्राय यीस्ट (Dry yeast) – २ टीस्पून मीठ – १ टीस्पून बटर किंवा तेल – ३ टेबलस्पून कोमट पाणी – आवश्यकतेनुसार बटर (ब्रशिंगसाठी) – थोडेसे

कृती: लादी पाव तयार करण्यासाठी सर्वप्रथम एका वाटीत कोमट दूध घ्या, त्यात साखर आणि ड्राय यीस्ट घाला. हलके ढवळून १० मिनिटं झाकून ठेवा. यीस्ट फुलून आली की फसफस दिसेल, म्हणजे ती तयार आहे. मोठ्या भांड्यात मैदा, मीठ आणि क्टिव्ह यीस्ट मिक्सचर घाला. त्यात हळूहळू कोमट पाणी किंवा दूध घालत मऊ कणिक मळा. नंतर त्यात बटर घालून १०-१२ मिनिटं कणिक चांगली मळा, जोपर्यंत ती लवचिक व स्मूद होत नाही. मळलेली कणिक तेल लावलेल्या भांड्यात ठेवा, वरून झाकण ठेवा आणि ती कोमट जागी सुमारे १ ते १.५ तास फुलवून ठेवा. कणिक दुप्पट आकाराची झाली की ती तयार आहे. फुललेली कणिक हलके हाताने दाबून हवेचा बुडबुडा काढा. नंतर समान आकाराचे छोटे गोळे करा आणि बेकिंग ट्रेमध्ये (थोडं अंतर ठेवून) एकत्र ठेवा.

## पाहुण्यांसाठी करा चमचमीत बेत! सोप्या पद्धतीमध्ये घरी बनवा हॉटेल स्टाईल चमचमीत दही छोले, पाहतच क्षणी तोंडाला सुटेल पाणी

घरी आलेल्या पाहुण्यांसाठी किंवा सणावाराच्या दिवसांमध्ये घरात नेमकी काय भाजी बनवावी? हे बऱ्याचदा सुचत नाही. नेहमीच ठराविक पनीर किंवा कडधान्यांच्या भाज्या खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची इच्छा होते. रोज डाळ भात भाजी चपाती खाऊन सगळ्यांचं खूप जास्त कंटाळा येतो. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये चमचमीत दही छोले बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. छोले चण्याची भाजी तुम्ही यापूर्वी बऱ्याचदा खाल्ली असेल. पण कायमच गोड्या मसाल्यातील वाटपाचे जेवण जेवून ऍसिडिटी किंवा अपचनाच्या समस्या वाढण्याची शक्यता असते. दही छोले तुम्ही चपाती, पुरी किंवा भाकरीसोबत सुद्धा खाऊ शकता. कमीत कमी साहित्यामध्ये दही छोले तयार होतात. तुम्ही बनवलेले दही छोले लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं खूप जास्त आवडतील. चला तर जाणून घेऊया दही छोले बनवण्याची सोपी रेसिपी.





साहित्य:

काबुली चणे

मीठ

लाल तिखट

दही

आलं लसूण पेस्ट

काजू

जिरं पावडर

हिरवी मिरची

कसुरी मेथी

कांदा

गरम मसाला

कोथिंबीर

कृती:

दही छोले बनवण्यासाठी सर्वप्रथम, कुकरच्या भांड्यात काबुली चणे घेऊन त्यात आवश्यकतेनुसार पाणी घालून शिट्ट्या काढा.

मिक्सरच्या भांड्यात दही, काजू, आलं-लसूण पेस्ट, हिरवी मिरची आणि मसाले घालून बारीक पेस्ट तयार करा. पेस्ट बनवताना त्यात पाणी घालू नये.

कढईमधील गरम तेलात जिरं, कढीपत्ता, तमालपत्र, कसुरी मेथी, बारीक चिरलेला टोमॅटो आणि कांदा घालून व्यवस्थित लाल होईपर्यंत भाजा.

कांदा शिजून तेल सुटल्यानंतर त्यात तयार केलेली पेस्ट टाकून मंद आचेवर व्यवस्थित भाजा. मसाला शिजल्यानंतर त्यात हळद, गरम मसाला, लाल तिखट आणि छोले मसाला टाकून पेस्ट शिजवा.

तयार केलेली पेस्ट व्यवस्थित शिजल्यानंतर त्यात शिजवून घेतलेले छोले टाकून मिक्स करा. आवश्यकतेनुसार पाणी घालून भाजीला उकळी काढा.

सगळ्यात शेवटी भाजीमध्ये बारीक चिरलेली कोथिंबीर घालून मिक्स करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले दही छोले.

## वाटीभर रव्याचा वापर करून सकाळच्या नाश्त्यासाठी सोप्या पद्धतीमध्ये इंस्टंट रव्याचे आप्पे, नोट करून घ्या रेसिपी

दिवाळीच्या दिवसांमध्ये सकाळच्या नाश्त्यात कायमच लाडू, चकली किंवा इतर फराळातील पदार्थ खाल्ले जातात. पण नेहमीच तेच पदार्थ खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची इच्छा सगळ्यांचं होते. अशावेळी वाटीभर रव्याचा वापर करून तुम्ही आप्पे बनवू शकता. आप्पे हा साऊथ इंडियन पदार्थ आहे. दक्षिण भारतात तांदूळ, उडीद डाळीपासून अनेक वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. हे पदार्थ जगभरात सगळीकडे फेमस आहेत. सकाळच्या वेळी पोटभर नाश्ता केल्यास शरीराला अनेक फायदे होतील. नाश्ता केल्यामुळे लवकर भूक लागत नाही. कायमच नाश्त्यात कांदापोहे, उपमा, शिरा, डोसा खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची सगळ्यांचं इच्छा होते. नाश्त्यात अतितिखट किंवा तेलकट पदार्थ खाऊ नये. कारण या पदार्थांच्या सेवनामुळे शरीरात ऍसिडिटी वाढते आणि संपूर्ण दिवस खराब जातो. चला तर जाणून घेऊया वाटीभर रव्याचे इन्स्टंट आप्पे बनवण्याची सोपी रेसिपी.



साहित्य: रवा

इनो

मीठ

कांदा

हिरवी मिरची

दही

कोथिंबीर

मीठ

तेल

कृती:

वाटीभर रव्याचे इन्स्टंट आप्पे बनवण्यासाठी, वाटीमध्ये रवा घेऊन त्यात दही आणि चवीनुसार मीठ घालून व्यवस्थित मिक्स करून घ्या.

१५ ते २० मिनिटं तयार केलेले मिश्रण झाकण मारून बाजूला ठेवून द्या. यामुळे इडलीच्या पिठासारखे मिश्रण तयार होईल.

तयार केलेल्या पिठात बारीक चिरलेला कांदा, हिरवी मिरची, कोथिंबीर, मक्याचे दाणे घालून व्यवस्थित मिक्स करून घ्या.

सगळ्यात शेवटी पिठात इनो मिक्स करून घ्या. ज्यामुळे रवा फुगून पीठ मऊ होईल.

आप्पे पात्र गरम करून त्यात तेल टाका. तेल व्यवस्थित गरम झाल्यानंतर त्यात तयार केलेले आप्पे पीठ घालून दोन्ही बाजूने आप्पे कुरकुरीत होईपर्यंत भाजून घ्या. तयार आहेत सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले इन्स्टंट रव्याचे आप्पे.

## Vitamin B-12 च्या कमतरतेमुळे थकवा वाढला आहे? मग आहारात करा 'या' हिरव्या पानांचे सेवन, कायमच राहाल फिट आणि हेल्दी

दीर्घकाळ निरोगी राहण्यासाठी आहारात कायमच वेगवेगळ्या पदार्थांचे सेवन केले जाते. शरीरात सर्वच विटामिन योग्य प्रमाणात असणे फार महत्वाचे आहे. अन्यथा संपूर्ण आरोग्याला हानी पोहचते. शरीरासाठी विटामिन बी १२ अतिशय महत्वाचे आहे. हे विटामिन नर्व्हस सिस्टिमला चांगले ठेवण्यासाठी मदत करते. यासोबतच शरीरातील लाल रक्त पेशी वाढवण्यासाठी विटामिन बी १२ आवश्यक आहे. निरोगी राहण्यासाठी शरीर स्वतः विटामिन तयार करत नाही. त्यामुळे विटामिन वाढवण्यासाठी आहारात वेगवेगळ्या पदार्थांचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो. विटामिन बी १२ ची कमतरता निर्माण झाल्यानंतर हातापायांना मुंग्या येणं, मांसपेशी कमकुवत होणं, थकवा, डोकेदुखी, चिडचिड होणं, डिप्रेशन, श्वास घेण्यास त्रास होणे इत्यादी अनेक समस्या उद्भवतात. मानसिक तणाव वाढून मेंदूचे संतुलन बिघडून जाते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला विटामिन बी १२ ची कमतरता भरून काढण्यासाठी आहारात कोणत्या पानाच्या भाजीचे सेवन करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. विटामिन बी १२ वाढवण्यासाठी 'या' पानांचे करा सेवन: विटामिन बी १२ ची कमतरता भरून काढण्यासाठी आयुर्वेदिक गुणधर्मांनी समृद्ध असलेल्या शेवग्याच्या पानांचे सेवन करावे. या पानांच्या सेवनामुळे शरीराला अनेक फायदे होतात आणि आरोग्य सुधारते. योग गुरू बाबा रामदेव यांनी विटामिन बी १२ ची कमतरता भरून काढण्यासाठी शेवग्याच्या पानांचे सेवन करण्याचा सल्ला दिला आहे. या पानांच्या सेवनामुळे नसांमध्ये वाढलेली कमजोरी दूर होते आणि शरीर कायमच हेल्दी राहते. शेवग्याच्या पानांना आयुर्वेदामध्ये विशेष महत्व आहे. यामुळे शरीराची ऊर्जा संतुलित राहते आणि शरीर कायमच निरोगी राहते. आयुर्वेदामध्ये विटामिन बी १२ वाढवण्यासाठी शेवगा. शेवग्याच्या शेंगा किंवा शेवग्याच्या पानांचे सेवन करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.



शेवग्याच्या पानांमध्ये आयर्न, कॅल्शियम, पोटॅशियम, बी- कॉम्पेलेक्स इत्यादी अनेक घटक आढळून येतात. विटामिन बी १२ शरीरासाठी रक्त तयार करते. या पानांच्या सेवनामुळे शरीराला तात्काळ ऊर्जा मिळते. शेवग्याची पाने खाल्ल्यामुळे पचनक्रिया सुधारते. शरीरात वाढलेली ऍसिडिटी, बद्धकोष्ठता आणि पचनाच्या सर्वच समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी शेवग्याच्या पानांची पावडर कोमट पाण्यात मिक्स करून प्यावी. यामुळे शरीरातील विषारी घटक बाहेर पडून जातात. आतड्यांमधील हालचाल सुलभ होण्यासाठी कोमट पाण्यात मोरिंगा पावडर मिक्स करून प्यावी.

शेवग्याच्या पानांचे सेवन केल्यामुळे मेंदूचे कार्य कायमच निरोगी राहते. एकाग्रता आणि मानसिक संतुलन वाढण्यासाठी शेवग्याच्या शेंगाचे सेवन करावे. शेवग्याच्या पानांमध्ये केरसेटिन आणि क्लोरोजेनिक ऍसिड मोठ्या प्रमाणावर आढळून येते. यामुळे न्युरॉनचा डॅमेजपासून बचाव होतो.हार्मोन्स संतुलित राहण्यासाठिव शेवग्याच्या पानांचे सेवन करावे.

# बाप-लेकाच्या निघृण खुनाचा छडा अवघ्या आठ तासांत - आरोपी अटकेत

लातूर:- अहमदपूर तालुक्यातील रुद्धा येथील शेतशिवारात सोमवार ते मंगळवारच्या मध्यरात्री झालेल्या बाप-लेकाच्या निघृण खुनाचा अवघ्या आठ तासांत छडा लावून आरोपींना अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाणे अहमदपूर यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. दिनांक ३ ते ४ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे अहमदपूर तालुक्यातील रुद्धा शिवारात स्वतःच्या शेतीतील आखाड्यावर शिवराज निवृत्ती सुरनर (वय ७० वर्षे) आणि त्यांचा मुलगा विश्वनाथ शिवराज सुरनर (वय २० वर्षे) या दोघांचा अज्ञात व्यक्तींनी धारदार शस्त्राने वार करून खून केला असल्याची माहिती अहमदपूर पोलीस ठाण्यास प्राप्त झाली.

सदर घटनेची गंभीर दखल घेऊन अहमदपूर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला. घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी तत्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांसह घटनास्थळी भेट देऊन गुन्ह्याचा तातडीने तपास सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

खुनाचा तपास वेगाने आणि काटेकोरपणे करण्यासाठी अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अहमदपूर श्री. रायबोले यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाणे अहमदपूर यांचे संयुक्त पथक नेमण्यात आले.

पथकाने गुन्ह्याचे स्वरूप, घटनास्थळावरील पुरावे, साक्षीदारांचे जबाब, आणि मृत व्यक्तींशी असलेल्या वैयक्तिक वादांचा बारकाईने अभ्यास केला. तपासादरम्यान जमिनीच्या वादातून ही दुर्दैवी घटना घडल्याचे निष्पन्न झाले.

तपासादरम्यान संशयितांवर लक्ष केंद्रित करून पोलिसांनी अत्यंत कौशल्याने आणि जलद हालचालीत अवघ्या आठ तासांत खालील दोघा आरोपींना अटक केली -

१️ नरसिंग भाऊराव शिंदे (वय ६० वर्षे)

२️ केरबा नरसिंग शिंदे (वय २३ वर्षे)

(दोघे रा. करेवाडी, ता. लोहा, जि. नांदेड) असे असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू असून, आरोपींना पोलीस कोठडी मिळविण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या देखरेखीखाली, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रायबोले यांच्या नेतृत्वात संयुक्त पथकातील पोलीस निरीक्षक विनोद म्हेत्रेवार, सुधाकर बावकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, संतोष केदासे, पो.उ.नि. राजेश घाडगे, प्रमोद देशमुख, तसेच पोलीस अंमलदार संजय कांबळे, रामलिंग शिंदे, साहेबराव हाके, अर्जुन राजपुत, दिनानाथ देवकते, युवराज गिरी, माधव बिलापटटे, नवनाथ हासबे, राजेश कचे, तुराब पठाण, मुन्ना मदने, जमीर शेख, पाराजी पुठठेवाड, तुळशीराम बरुरे, राहुल काबळे, शैलेश सुडे, गणेश साठे, व्यंकटेश निदुरे, श्रीनिवास जांभळे तसेच पोलीस ठाणे अहमदपूर येथील तानाजी आरदवाड, विशाल सारुळे, कांबळवाड आदींचा समावेश होता.

अत्यंत गंभीर स्वरूपाच्या या दुहेरी खुनाच्या गुन्ह्यात पोलिसांनी दाखविलेली वेगवान व परिणामकारक कार्यवाही उल्लेखनीय आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हा पोलीस दल सदैव तत्पर असून अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी ठोस पावले उचलली जातील, असे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सांगितले.

## बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद पंचायत समिती, नगर परिषद निवडणुकांमध्ये समविचारी पक्ष संघटनेचा सक्षम पर्याय देण्यासाठी लवकरच बैठक - भाई मोहन गुंड

केज/प्रतिनिधी बीड जिल्ह्यासह राज्यातील कार्यकाळ संपलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुका लवकरच जाहीर होणार आहेत. या पार्श्वभूमीवर भांडवलदार आणि प्रस्थापित पक्षांविषयी सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास उरलेला नाही, अशा भावना व्यक्त करत शेतकरी कामगार पक्षाचे नेते व राज्य चिटणीस मंडळ सदस्य भाई मोहन गुंड यांनी बीड जिल्ह्यातील समविचारी पक्ष संघटनांच्या प्रमुखांसमवेत बैठक घेऊन जिल्ह्यात एक सक्षम पर्याय उभा करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. भाई गुंड म्हणाले की, भांडवलदार व प्रस्थापित पक्ष केवळ स्वतःच्या संस्था, कारखाने आणि राजकीय अस्तित्व टिकविण्यापुरतेच कार्य करतात. त्यांनी आजपर्यंत सर्वसामान्य कार्यकर्ते व तरुणांचा कधीही विचार केलेला नाही. त्यामुळे या वेळी जिल्ह्यातील तरुणांना पुढे आणण्यासाठी आणि सर्वसामान्य जनतेचा आवाज होण्यासाठी समविचारी पक्ष आणि संघटनांना एकत्र करून जिल्ह्यात नवा राजकीय पर्याय देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. ते पुढे म्हणाले की, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सर्व जागा लढविण्याच्या दृष्टीने लवकरच समविचारी पक्षांचे नेते, कार्यकर्ते आणि सामाजिक संघटनांची महत्वपूर्ण बैठक आयोजित केली जाणार आहे. या बैठकीत सर्वांनुमते पुढील रणनीती ठरवून जिल्ह्यात शेतकरी, कामगार, श्रमजीवी वर्ग आणि सर्वसामान्य जनतेचा राजकीय आवाज बळकट करण्याचा संकल्प केला जाईल. बीड जिल्ह्यात शांत, संयमी आणि विचारप्रधान राजकारणाचा पाया मजबूत करण्यासाठी ही आघाडी सक्षम पर्याय ठरणार असल्याचे भाई मोहन गुंड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले.

कुठल्या ही प्रस्थापित पक्षावर सामान्यचा विश्वास राहीला नाही म्हणून, जिल्ह्यातील समविचारी पक्ष संघटनेच्या तरुण कार्यकर्त्यांनी या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन भाई मोहन गुंड यांनी केले आहे.



## राहुल गांधींचा 'हायड्रोजन बॉम्ब' हरियाणा निवडणुकीवर ; कॉँग्रेसचा विजय पराभवात बदलल्याचा आरोप, पुरावे केले सादर

कॉँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी नवी दिल्लीतील इंदिरा भवन याठिकाणी मतचोरीच्या मुद्द्यावर पत्रकार परिषद घेत आहेत. H-Files शीर्षक असलेल्या या पत्रकार परिषदेत राहुल गांधींनी निवडणूक हेराफेरीचे गंभीर आरोप केले आहेत. बिहारमधील १२१ विधानसभा जागांसाठी पहिल्या टप्प्यातील मतदान होण्याच्या एक दिवस आधी ही पत्रकार परिषद घेण्यात आली आहे.कॉँग्रेसने त्यांच्या अधिकृत सोशल मीडियावरून एका पोस्टमध्ये राहुल गांधींच्या पत्रकार परिषदेचे वर्णन हायड्रोजन बॉम्ब लोडिंग असे केले होते. राहुल गांधींनी पत्रकार परिषदेच्या सुरुवातीला गुरु नानक देव यांचे नाव घेतले. H-Files या नावाबाबत ते म्हणाले की, हे एकाच विधानसभा मतदारसंघाबद्दल नव्हते. राज्यांमध्ये मतांची चोरी होत आहे. हरियाणाच्या निवडणूक इतिहासात पहिल्यांदाच पोस्टल मतपत्रिका आणि प्रत्यक्ष मतांचे स्वरूप वेगळे होते. पोस्टल मतपत्रिकांमुळे कॉँग्रेसला ७६ जागा मिळाल्या, तर भाजपला फक्त १७ जागा मिळाल्या. नेहमीच असे घडले आहे की पोस्टल मतपत्रिका आणि प्रत्यक्ष मतांची दिशा समान होती.राहुल गांधी यांनी हरियाणातील एक्झिट पोलचाही उल्लेख केला आणि म्हटले की त्यांनी कॉँग्रेसचा विजय अपेक्षित केला आहे. त्यांनी सांगितले की स्थानिक नेते आणि पक्षाच्या टीमने काटेकोर नियोजन करून निवडणुकीची तयारी केली आहे. त्यांनी असेही नमूद केले की हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सैनी यांनी स्पष्ट केले आहे की ते सरकार स्थापन करणार आहेत आणि सर्व व्यवस्था पूर्ण केल्या आहेत. ते म्हणाले ,की हरियाणातील एक्झिट पोलमध्ये कॉँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळेल असा अंदाज होता. सर्व पोल तेच दर्शवत होते. परंतु, पहिल्यांदाच पोस्टल व्होट्स आणि प्रत्यक्ष व्होट्समध्ये लक्षणीय तफावत दिसून आली.एका तरुणीने २२ मते टाकली राहुल गांधींच्या पत्रकार परिषदेत एका तरुणीचा फोटो दाखवण्यात आला. या फोटोसोबतच २२ ठिकाणी वेगवेगळ्या नावांनी मतदान केल्याचे आरोपही समोर आले. राहुल गांधी म्हणाले की या तरुणीने कधी सीमा तर कधी सरस्वती हे नाव वापरून २२ मते टाकली. राहुल गांधींनी हरियाणाच्या मतदार यादीत ही ब्राझिलियन महिला काय करत आहे ?असा प्रश्न उपस्थित केला. हरियाणात पाच श्रेणींमध्ये २५ लाख मते चोरीला गेली. त्यांनी श्रेणीनिहाय आकडेवारी देखील दिली, ज्यामध्ये ५२१,००० हून अधिक डुप्लिकेट मतदार सापडले.

## लातूरमध्ये बेशिस्त वाहनचालकांवर विठ्ठल दराडे यांच्या नेतृत्वाखाली धडक मोहीम

लातूर :- लातूर शहरातील वाढत्या बेशिस्त वाहतुकीवर नियंत्रण आणण्यासाठी वाहतूक नियंत्रण शाखेकडून पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू आहे. शहरातील औसा रोड, क्रीडा संकुल परिसर, रिंगरोड व प्रमुख चौकांमध्ये टेप साऊंड, ब्लॅक फिल्म, मोठ्या आवाजाचे सायलेंसर, ओव्हरस्पीड, ट्रिपल सीट, हेल्मेट न वापरणे, मोबाईलवर बोलत वाहन चालविणे आणि नियमबाह्य ठिकाणी पार्किंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध ई-चलान मशीनद्वारे दंडात्मक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत २५६ ऑटोरिक्षाचालकांवर कारवाई करून २ लाख १३ हजार ८५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच इंटरसेप्टर वाहनाद्वारे २६ ओव्हरस्पीड प्रकरणांवर ५२ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. ज्या ऑटोरिक्षाचालकांनी पूर्वीच्या ई-चलानचा दंड भरलेला नाही, त्यांच्यावर खटले दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई सुरू असून, शहरातील वाहतुकीस शिस्त लावण्यासाठी ही मोहीम आणखी तीव्र करण्यात येणार आहे. पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी नागरिकांना आवाहन केले की, वाहतुकीचे नियम पाळा, आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवा आणि शिस्तबद्धपणे वाहन चालवा. नियम तोडल्यास कठोर कारवाई टाळता येणार नाही.

## केज येथे भव्य ग्रामीण तीन दिवशीय कृषी प्रदर्शन आधुनिक तंत्रज्ञान समजून घेण्याची शेतकऱ्यांना संधी

केज/प्रतिनिधी तालुक्यातील शिंजीर मिल्क ण्ड ग्रो प्रोडयुसर कंपनी केज यांच्या वतीने नोव्हेबर महिण्यात दि.७ ते ९ या कालावधीत कृषी प्रदर्शनाचे आयोजन विठाई मंगल कार्यालय, धारुर रोड केज येथे करण्यात आले आहे. जिल्हयातील सर्व शेतकरी बांधव व्यवसायीक यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन कंपनीचे संचालक विशाल चौरे यांनी केले आहे. या प्रदर्शनात महाराष्ट्रातील शेतीशी निगडीत आधुनिक तंत्रज्ञान,पाणी व्यवस्थापन,पिक व्यवस्थापन या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्या सहभागी होणार आहेत. केज तालुक्यात पहिल्यांदाच कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना कृषी निगडीत आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, यासाठी पश्चिम महाराष्ट्रात दरवर्षी विविध प्रदर्शने होतात. याच धर्तीवर केज मध्ये शिंजीर मिल्क ण्ड ग्रो प्रोडयुसर कंपनीने पुढाकार घेत या कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यामुळे केज तालुक्यातील तसेच बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान समजुन घेण्यासाठी संधी मिळणार आहे. या प्रदर्शनामध्ये प्रगत शेती मशिनरी,आधुनिक साधने सुधारीत बीयाणे,खते ,किटक नाशके,दुग्धव्यवसाय या विषयी थेट प्रात्यक्षीके पाहण्यास मिळतील. हे प्रदर्शन शेतकरी, व्यापारी, विक्रेते, वैज्ञानिक, विदयार्थी यांच्यासाठी एक व्यासपीठ म्हणुन उपलब्ध असणार आहे. यामुळे आपल्या जिल्हयातील तसेच मराठवाडयातील शेतीतील व शेतीपुरक व्यवसायातील उत्पादनासाठी निश्चीतच मदत होईल. तसेच मराठवाडयातील पारंपारीक शेतीचे देखावे हे या कृषी प्रदर्शनाचे खास आकर्षण असणार आहे. शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## भाजपची मोर्चेबांधणी सुरू!!! नगरपालिकेतून तीन संभाव्य उमेदवारांची यादी प्रदेशाध्यक्षांकडे सादर

राज्य निवडणूक आयोगाने २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतीच्या निवडणुका जाहीर केल्या आहेत. यानंतर आता भाजपने जोरदार तयारीला सुरुवात केली आहे. भाजपने निवडणुका जाहीर होण्यापूर्वी प्रत्येक नगरपालिकेमध्ये निरीक्षक पाठवून मोर्चेबांधणी केली होती. या निरीक्षकांनी स्थानिक पदाधिकारी आणि शहर कार्यकारिणीशी चर्चा करून प्रत्येक नगरपालिकेतून तीन संभाव्य उमेदवारांची नावे निश्चित केली आहेत. ही यादी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना सादर करण्यात आली आहे.

यावेळी थेट जनतेमधून नगराध्यक्षाची निवड होणार आहे. त्यासाठी भाजपकडून कसून चाचपणी करण्यात आली आणि उमेदवार ठरवण्यात आले. तसेच नगराध्यक्ष कोण असावा, याबाबतही निरीक्षकांनी पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेतली आहेत. याशिवाय मित्र पक्षांसोबत युती करायची की स्वबळावर लढायचे? यासंदर्भात देखील निरीक्षकांकडून माहिती घेण्यात आल्याचे म्हंटले जात आहे. भाजपकडून प्रत्येक नगरपालिकेच्या शहरांत पक्षाचे आमदार, जिल्हाध्यक्ष, प्रमुख पदाधिकारी यांना पाठवण्यात आले होते. विविध आघाड्यांच्या अध्यक्षांसह भाजपची प्रत्येक शहरात ६१ जणांची कार्यकारिणी आहे. यांच्याद्वारे त्या शहराचे रहिवासी असलेले जिल्हा पदाधिकारी, महापालिका पदाधिकारी यांची चर्चा करून नगराध्यक्षपदाचे योग्य उमेदवार कोण, हे ठरवण्यात आले आहेत. यामधूनच भाजपकडून प्रत्येक शहरात तीन नावे ठरवण्यात आली आहे. या ३ नावांचे सर्वेक्षण तातडीने केले जाणार असूनप्रत्येक शहरातील मतदारांना या उमेदवाराबाबत काय वाटते? याचा आढावा सर्वेक्षणाच्या माध्यमातून घेतला जाणार आहे, अशी माहिती सुत्रांद्वारे समोर येत आहे.


## अमेरिकन वस्तूंवरील शुल्क २४ टक्क्यांनी कमी करण्याची घोषणा

चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यांनी अमेरिकन वस्तूंवरील शुल्क २४ टक्क्यांनी कमी केले आहे. जिनपिंग यांनी नुकतीच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली. ट्रम्प आणि शी यांच्यातील बैठकीनंतर दोन्ही देशांमधील सुरू असलेले मतभेद दूर झाल्याचे दिसून येत आहे. बैठकीनंतर लगेचच जिनपिंग यांनी घोषणा केली. त्यांनी घोषणा करताना, चीन अमेरिकन सोयाबीन खरेदी पुन्हा सुरू करेल असे ,म्हटले होते.

एका इंग्रजी वर्तमानपत्राच्या वृत्तानुसार, चीनने अमेरिकन वस्तूंवरील २४ टक्के शुल्क एका वर्षासाठी कमी केले आहे, परंतु १० टक्के शुल्क कायम राहील. चीन १० नोव्हेंबरपासून काही अमेरिकन कृषी उत्पादनांवरील १५ टक्के शुल्क देखील कमी करेल. डोनाल्ड ट्रम्प आणि शी जिनपिंग यांच्यातील बैठकीनंतर बीजिंगचा हा निर्णय आला आहे. अमेरिका आणि चीनमध्ये दीर्घकाळापासून मतभेद आहेत. मात्र, आता संबंधांमध्ये सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.चीन-अमेरिकेत दीर्घकाळापासून सुरू असलेले शुल्क युद्ध जिनपिंग आणि ट्रम्प यांची दक्षिण कोरियातील बुसान येथे भेट झाली. या बैठकीनंतर लगेचच ट्रम्पने चीनवरील १० टक्के शुल्क कमी केले. त्यांनी चीनवरील ५७ टक्के शुल्क ४७ टक्क्यांपर्यंत कमी केले. टॅरिफ वॉरमुळे चीनने अमेरिकन सोयाबीन खरेदी करणे थांबवले होते, ज्यामुळे त्यांच्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले. मात्र, नंतर चीनने सोयाबीन खरेदी पुन्हा सुरू करण्याची घोषणा केली. ट्रम्पनेही भारताबाबत मऊ भूमिका स्वीकारली अमेरिकेने चीनसोबत भारतावरही ५० टक्के कर लादला होता.

# उत्तर प्रदेशात मोठा अपघात ; रेल्वेच्या धडकेत अनेकांचा दुर्दैवी मृत्यू

उत्तर प्रदेशातील मिर्झापूर जिल्ह्यात आज सकाळी एक मोठा रेल्वे अपघात झाला. चुनार रेल्वे स्थानकावर रेल्वेने चिरडून अनेकांचा जणांचा मृत्यू झाला असल्याचे सांगण्यात येत आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या दुःखद अपघाताची दखल घेतली आणि मृतांच्या शोकाकुल कुटुंबांबद्दल शोक व्यक्त केला.



मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अधिकाऱ्यांना तातडीने घटनास्थळी पोहोचून मदत कार्य जलद करण्याचे निर्देश दिले आहेत. शिवाय, त्यांनी एसडीआरएफ आणि एनडीआरएफ पथकांना घटनास्थळी पोहोचून तातडीने मदत कार्य सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत आणि जखमींवर योग्य उपचार करण्याचे निर्देशही दिले आहेत. जखमींना लवकर बरे होण्याच्या शुभेच्छा मुख्यमंत्री योगी यांनी दिल्या.

कसा झाला अपघात ? काल्का-हावडा एक्सप्रेस अचानक वेगाने रुळांवर आली तेव्हा लोक पायी रेल्वे ट्रॅक ओलांडत असल्याचे वृत्त आहे. सुमारे सहा जणांना रेल्वेने धडक दिली आणि ते गंभीर जखमी झाले. घटनास्थळी उपस्थित असलेल्या लोकांचे म्हणणे आहे की अपघात इतका भीषण होता की मृतांच्या मृतदेहांचे तुकडे झाले होते.

हे सर्व प्रवासी कार्तिक पौर्णिमेला स्नान करण्यासाठी आले होते आणि चुकीच्या दिशेने रेल्वेमधून उतरल्यानंतर अपघात झाला. घटनास्थळी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे आणि बचावकार्य सुरू आहे. रेल्वे प्रशासनाने चौकशीचे आदेश दिले आहेत. चुनार स्टेशन परिसरात गोंधळ उडाला आहे.

रेल्वे अपघाताबाबत रेल्वेचे निवेदन रेल्वेच्या म्हणण्यानुसार, आज (बुधवार, ५ नोव्हेंबर) सकाळी काही प्रवासी चोपन चुनार पॅसेंजर ट्रेनने मिर्झापूरमधील चुनार रेल्वे स्टेशनवर आले, परंतु ते मुख्य दरवाजाऐवजी दुसऱ्या दरवाजातून दुसऱ्या मार्गावर उतरले. त्याच वेळी, कालका-हावडा ट्रेन लाईनवर आली आणि प्रवाशांना धडक बसली. रेल्वेकडून चार जणांच्या मृत्यूंची पुष्टी रेल्वेने आतापर्यंत चार जणांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. तथापि, मृतांचा आकडा वाढू शकतो असेही म्हटले आहे. रेल्वेच्या म्हणण्यानुसार, हे एमआरओ (मॅन रन ओव्हर) चे प्रकरण आहे. कार्तिक पौर्णिमेच्या स्नानामुळे प्लॅटफॉर्मवर आधीच मोठी गर्दी होती हे लक्षात घ्यावे. चुनार रेल्वे स्टेशनवर चोपन-चुनार पॅसेंजर ट्रेनमधून प्रवासी उतरले होते. ही ट्रेन चुनार रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ४ वर थांबली होती. प्रवाशांनी रेल्वे रुळ ओलांडून गंगेत स्नान करण्यासाठी प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर जाण्याचा विचार केला. त्याच वेळी, कालका-हावडा ट्रेन तिथून जात होती आणि अनेक प्रवाशांना ट्रेनने धडक दिली.

## निवडणूक जाहीर होताच पुणे जिल्ह्यातून शरद पवारांना मोठा धक्का; या बड्या नेत्याने सोडली साथ, शिंदेच्या सेनेत दाखल होणार

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पहिला टप्प्यातील निवडणुकीचा कार्यक्रम काल जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतीसाठी निवडणुका होणार आहेत. मात्र, या निवडणुका जाहीर होताच शरद पवार यांना पुणे जिल्ह्यातून मोठा धक्का बसला आहे. खेड तालुक्यातील माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला रामराम ठोकला आहे. अतुल देशमुख शिंदेसेनेत पक्ष प्रवेश करणार आहेत. त्यांच्या पक्षप्रवेशाचा कार्यक्रम उद्या ६ नोव्हेंबरला चाकण येथे पार पडणार आहे. त्यांच्या सोबत अनेकजण आपल्या हाती धनुष्यबाण घेणार आहेत. अतुल देशमुख यांनी पक्षांतर्गत मतभेद आणि स्थानिक राजकीय समीकरणांमुळे हा निर्णय घेतला असल्याची चर्चा आहे. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे शिंदे सेनेला उत्तर पुण्यात बळ मिळणार असून, शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला निवडणुकीपूर्वीच मोठा धक्का बसला आहे.

ऐन निवडणुकीच्या तोंडावर पक्षाला लागलेली गळती या निवडणुकीसाठी मोठा फटका देणारी ठरू शकते असा अंदाज व्यक्त केला जात आहे. अतुल देशमुख यांची खेड तालुक्यात मजबूत पकड असून, स्थानिक पातळीवर हजारो कार्यकर्ते आणि जनसंपर्क असल्याने त्यांचे येथील राजकारणात मोठे नाव आहे. एक वर्षापूर्वी भाजपचा राजीनामा देत ते राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात आले होते. अतुल देशमुख यांच्यासह चाकण, राजगुरुनगर आणि आळंदी नगरपालिकांतील नगरसेवक, पंचायत समिती सदस्यांसह अनेक कार्यकर्तेही शिंदेसेनेत दाखल होणार आहे. चाकण येथील भाग्यश्री मंगल कार्यालयात शुक्रवारी दुपारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, या मेळाव्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीतसह शिवसेना शिंदे गटातील वरिष्ठ नेते, आमदार आणि महत्वाचे नेते उपस्थित राहणार आहेत.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.